# आरे-बीकेसी मेट्रो 'रुळा'वर

## मार्गिकेची ७४ टक्के उभारणी पूर्ण

म. टा. खास प्रतिनिधी

**मुंबई :** मेट्रो ३चा पहिला टप्पा आरे ते बीकेसीदरम्यान सुरू होणार आहे. या मार्गिकेवरील रुळांची उभारणी ७४ टक्के पूर्ण झाली आहे. मुख्य म्हणजे मरोळ ते आरे यादरम्यानची रुळ उभारणी १०० टक्के पूर्ण झाली आहे.

राज्यातील पहिली भूमिगत मेट्रो आरे ते कफ परेडदरम्यान धावणार आहे. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडकडून (एमएमआरसी) त्याची उभारणी सुरू आहे. यापैकी पहिला टप्पा आरे ते बीकेसीदरम्यान डिसेंबर २०२३पासून सुरू करण्याचे लक्ष्य सरकार व प्रशासनाने निश्चित केले आहे. त्यादृष्टीने आरे वगळता स्थानक व प्रणाली उभारणीचे काम ९० टक्के पूर्ण झाले आहे. आता रुळ उभारणीच्या कामाला कंपनीने सुरुवात केली आहे.

आरे ते बीकेसी मार्गिकेचा हा पहिला टप्पा २४.५३ किलोमीटरचा आहे. त्यामध्ये ११ स्थानकांचा समावेश आहे. संपूर्ण मार्गिकेच्या (आरे ते कफ परेड) पॅकेज क्रमांक ५, ६ व ७मध्ये रुळ उभारणीचे काम सुरू आहे. यापैकी पॅकेज ७मध्ये आरे ते मरोळ नाका स्थानकांचा समावेश आहे. या ८.५३ किमी लांबीच्या मार्गावरील रुळ उभारणी १०० टक्के पूर्ण करण्यात एमएमआरसीला यश आले आहे. तर पॅकेज ५चे काम ७६.१४ आणि पॅकेज ५चे काम ७५.३० टक्के पूर्ण झाले आहे. त्यामध्ये अनुक्रमे ५.७ किमी व ६.२९ किमी लांबीच्या रुळांचा समावेश आहे.



### भुयारीकरण जवळपास पूर्ण

मेट्रो ३ ही मुंबईच्या पश्चिम उपनगरांना उत्तर-दक्षिण जोडणारी मार्गिका आहे. उत्तरकडे आरे ते दक्षिणेकडे कफ परेडपर्यंत ही मार्गिका असेल. स्थानकांची उभारणी ९२.९० टक्के तर स्थानकांशी संबंधित भुयारीकरणाचे काम ९७.७० पूर्ण झाले आहे. एकूण प्रणालीचा विचार केल्यास ती कामे मात्र ६४.७० टक्केच पूर्ण झाली आहेत. तर वीजपुरवठ्यासंबंधीची कामे ५७.९० टक्के पूर्ण झाली आहेत. मात्र आरे स्थानकाचे काम ३० टक्केच पूर्ण झाल्याने ते आव्हानात्मक आहे.